# विवेकानंदांचा राष्ट्रधर्म

वि. वि. पेंडसे



कृण्वन्तो विश्वम् आर्यम्।

**स्वामी विवेकानंद म्हणतात**

या येत्या पन्नास वर्षांमध्ये ही आपली मातृभूमी,
थोरली आई, हिंदुभूमी हीच आपणां सर्वांची
देवता असू द्या...हेच एक दैवत खरोखरी जागृत आहे.
आमचे हिंदुराष्ट्र ! सर्वत्र त्याचेच हात, सर्वत्र त्याचेच पाय,
सर्वत्र त्याचेच डोळे ! ....आमच्या सभोवती
व्यापून उरलेल्या या विराट पुरुषाला विसरून
दुसऱ्या कोण्या देवाचे पूजन करणे शक्य कसे आहे ?

**या पुस्तकाचे लेखक वि. वि. पेंडसे त्यावर भाष्य करतात**

- हिंदू समाजातील कृत्रिम भेद न पाहता सर्वांवर प्रेम करणे हा आमच्या कार्यपद्धतीतील पहिला विशेष असला पाहिजे.
- दुसरे असे की विचारांना येथे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे.
- समाज-अंतर्गत अशा, पण मूलग्राही विरोधातसुद्धा हृदयपरिवर्तन हीच पद्धत हवी.
- केवळ परमतसहिष्णुताच नव्हे तर अन्य मत धारण करणाऱ्या व्यक्तीबद्दलही अंतःकरणात आत्मीयताच अनुभवणे हेच हिंदू संस्कृतीच्या दृष्टीनेही विहित असणार यात शंका नाही.

# विवेकानंदांचा राष्ट्रधर्म

*

संकलक व लेखक

वि. वि. पेंडसे

प्रकाशक :
कार्यवाह,
**ज्ञान प्रबोधिनी,**
५१० सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

✧

मुद्रक :
**प्रबोध संपदा,**
सुभाषनगर गल्ली क्र. ५
पुणे – ४११ ००२

✧

© कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी

✧

आवृत्ती पहिली : कालावधी अज्ञात

✧

आवृत्ती दुसरी : जानेवारी १९५४

✧

आवृत्ती तिसरी : ऑगस्ट १९९४

✧

आवृत्ती चौथी : ऑगस्ट २००९

✧

**मूल्य : रुपये ६०/–**

# चौथ्या आवृत्तीची प्रस्तावना

या पुस्तकाच्या पहिल्या दोन आवृत्त्या 'विवेकानंद काय म्हणाले ?' या नावाने प्रकाशित झाल्या होत्या. तिसरी आवृत्ती 'विवेकानंदांचा राष्ट्रधर्म' या नावाने प्रकाशित झाली. तिच्यात शुद्धलेखनाच्या नव्या नियमांचा वापर केला होता.

चौथ्या आवृत्तीमध्ये या पुस्तकातील 'स्वामीजींचे हिंदुत्वावरील विचार' या पहिल्या प्रकरणात भर घातली आहे. स्वामी विवेकानंदांच्या समग्र वाङ्मयाच्या आठ खंडांपैकी तीन, चार, पाच आणि आठ या चार खंडांमधले एकूण बहात्तर वेचे कै. वि. वि. पेंडसे यांनी 'स्वामीजींचे हिंदुत्वावरील विचार' या शीर्षकाखाली संकलित केले होते. त्यांचा क्रम होता तसाच ठेवला आहे. परंतु त्या वेच्यांची पंधरा गटांमध्ये विभागणी करून प्रत्येक गटाच्या सुरुवातीला त्या वेच्यांच्या निवडीसंबंधीचे स्पष्टीकरण नव्याने समाविष्ट केले आहे. त्यामुळे या संकलनाचे सूत्र लक्षात यायला उपयोग होईल, असा विश्वास वाटतो.

या संकलनानंतर राष्ट्रीयत्वासंबंधीचे लेखकाचे स्वत:चे चिंतन 'हिंदुराष्ट्र चिंतन' या प्रकरणात दिले आहे; आणि हे चिंतन विवेकानंदांच्या विचारांशी कसे सुसंगत आहे यासंबंधीचा विचार समारोपाच्या प्रकरणात केला आहे. तसेच स्वामीजींच्या विचारांचे सार लेखकाने या पुस्तकाच्या समारोपाच्या प्रकरणात एकोणीस मुद्द्यांमध्ये दिले आहे. या पुस्तकात ज्या क्रमाने स्वामीजींचे विचार आले आहेत, त्याच क्रमाने वरील सारांशाचे मुद्दे पुढे दिले आहेत.

या नवीन आवृत्तीमध्ये स्वामीजींच्या विचारांची विभागणी ज्या पंधरा गटांमध्ये केली आहे, त्यांपैकी गट क्र. १, २,३,७,८,९ आणि १४ या गटांमधील मुद्दे सारांशात आले आहेत. तसेच 'हिंदुस्थानाचा भविष्यकाळ' या व्याख्यानातील मुद्देही सारांशात आले आहेत. 'हिंदू धर्म प्रणीत हिंदू समाज म्हणजे राष्ट्र' असे स्वामीजींना घडलेले हिंदू राष्ट्राचे दर्शन या सारांशातून व्यक्त होते.

**भाग १**

१. सिंधू नदीवरून हिंदू हे नाव उत्पन्न झाले.

**भाग २**

२. आमच्या समाजाची अथवा राष्ट्राची प्रेरक शक्ती ही राजकारण वा अर्थकारण इत्यादी गोष्टींत नसून ती धर्मामध्ये आहे. या चैतन्याला हात घातल्याविना समाज जागा व्हायचा नाही.

३. 'अल्ला हो अकबर' या आरोळ्यांनी शेकडो वर्षे आकाश कुंद होऊन गेले असताना आपले आयुष्य कोणत्या क्षणी संपेल याची शाश्वती कोणाही हिंदूला राहिली नसताना आपण (हिंदू) जवळ जवळ जसेच्या तसे खडे आहोत, याचे कारण आपल्यातील धर्मचैतन्य.

**भाग ३**

४. हिंदू धर्मातून परधर्मात गेलेल्या लोकांना स्वधर्मात घेतले पाहिजे. कारण हिंदू समाजातून गेलेली प्रत्येक व्यक्ती हिंदूंची संख्या एकाने घटवते, एवढेच नसून शत्रूची संख्या एकाने वाढवते.

५. जे निखालस परकीय आहेत, त्यांनासुद्धा हिंदुत्वात घेतले पाहिजे.

**भाग ७**

६. हिंदू समाजातील विघटनाचे कारण धर्म नसून धर्माबद्दलच्या विपरीत कल्पना आहेत.

७. हिंदुस्थानने सर्व जगामध्ये जाऊन अध्यात्म शिकवले पाहिजे, आणि पाश्चात्त्यांचे शास्त्रीय ज्ञान, त्यांची संघटनकुशल वृत्ती या गोष्टी स्वीकारल्या पाहिजेत.

**भाग ८**

८. या संघटनेच्या योगे आम्ही निर्मत्सर, विद्याभिमुख आणि समाज सेवारत झाले पाहिजे.

**भाग ९**

९. हिंदू समाजाची संघटना केल्याशिवाय या देशाचे प्रश्न सुटणार नाहीत.

१०. बहुमत-निर्णय-पद्धती (Democracy) देशपातळीवर कितीही चांगली असली तरी आजच्या स्थितीमध्ये (स्वामीजींच्या काळातील स्थितीमध्ये) वर उल्लेखिलेल्या 'संघटनेने' एकाधिकार (Dictatorship) पद्धतीचा अवलंब केला पाहिजे.

**भाग १४**

११. पाश्चात्त्यांची भ्रष्ट नक्कल करण्यात देशाची हानी आहे. खरी सुधारणा आतून झाली पाहिजे.

## हिंदुस्थानचा भविष्यकाळ

१२. हिंदू हे उत्तर धुव्र किंवा आशिया मायनर अशा कोणत्याही हिंदुस्थानबाह्य प्रदेशातून आलेले नाहीत. हिंदू हिंदुस्थानातीलच आहेत.

१३ मुळात एकवर्ण असलेला हा समाज चतुर्वर्णात परिणत झाला.

१४. शूद्र व द्रविड हे मूळचे आर्यच. द्रविड म्हणून कोणताही वेगळा वंश नाही.

१५. एका वर्णातून अनेक वर्ण झाले. यापुढे अनेक वर्णांतून एका म्हणजे ब्राह्मण वर्णाकडे जायचे आहे. जाती-जातींमधील बंधने ही दृढ आणि पक्की नसून लवचिक आणि विकासाला वाव देणारी आहेत.

१६. संस्कृत भाषा ही आमच्या संस्कृतीची निदर्शक असून तिचा अभ्यास सर्व वर्णांतील स्त्री-पुरुषांनी केला पाहिजे. त्यातील अध्यात्मविचारांचे ग्रहण केले पाहिजे.

१७. हा धर्म म्हणजे नीतिनियमांचे जुडगे नसून अध्यात्मनिष्ठ, अत्यंत व्यापक व सर्व विचारभेदांचे संग्रह करणारा असा आहे.

१८. म्हणून भविष्यकालीन हिंदुस्थानात एकच एक अशा या व्यापक धर्माला या टोकापासून त्या टोकापर्यंत मान्यता मिळणे आवश्यक आहे.

१९. देशाभिमानाने ज्यांची हृदये उचंबळून येतात, असे प्रचारक निर्माण करून ते सर्व देशभर धाडले पाहिजेत आणि त्यांनी पक्षभेदातीत अशी संघटना घडवून आणली पाहिजे.

गट क्र. ४, ५, ६, १०, ११, १२, १३ आणि १५ या गटांमधील मुद्दे सारांशात आलेले नाहीत. तसेच 'आम्हांसमोरील कार्य' या भाषणातील मुद्देही सारांशात आलेले नाहीत, ज्या गटांमधील मुद्दे सारांशात आलेले नाहीत, त्यांमध्ये 'हिंदू व्यक्तीचा विकास'

आणि ‘हिंदू राष्ट्राचा विकास’ यांसंबंधीचे मुद्दे आलेले आहेत.

‘व्यावहारिक वेदान्ताची म्हणजेच समता नि संघटन यांची भर अद्वैत-विचारात पडून हिंदू समाज सामर्थ्यसंपन्न व्हावा’, या एका वाक्यात विवेकानंदांनी नव्याने उलगडून सांगितलेल्या राष्ट्रधर्माचे सार कै. आप्पांनी या वैचारिक प्रबंधातून काढले आहे. वाचकांना विवेकानंदांचे वाङ्मय वाचताना या पुस्तकात मांडलेले हे मध्यवर्ती सूत्र मार्गदर्शक होईल असा विश्वास वाटतो.

**– गिरीश श्री. बापट**

# अनुक्रमणिका


❖ **विवेकपथ दर्शन**

★ स्वामीजींचे हिंदुत्वावरील विचार / ११

★ भारतीय व्याख्याने / ५२

✧ आम्हांसमोरील कार्य / ५३

✧ हिंदुस्थानचा भविष्यकाळ / ५८

❖ **लेखकाचे चिंतन**

★ हिंदुराष्ट्र विवेचन / ६७

★ समारोप, आक्षेप–विचार / १०१